# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

## एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

## नवीन प्रशासकिय इमारत, ६ वा मजला, वैद्यकिय आरोग्य विभाग

## थेट मुलाखत (Walk In Interview)

जा.क्र. भिनिशमनपा./वैआवि/ ०६८ / ,दि. ७ /०७ /२०२१

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, वैद्यकिय आरोग्य विभागाकरीता शासनाच्या राष्ट्रीय आरोग्य अभियान (NUHM)अंतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी आवशक खालील संवर्गातील अस्थायी स्वरुपाची पदे करार पद्धतीने भरावयाची आहेत. यानुसार मा. आयुक्त सो. यांची दि. २४ डिसेंबर २०२० रोजीच्या मान्यतेनुसार विहीत अर्हताप्राप्त उमेदवारांच्या थेट मुलाखती (Walk In Interview) आयोजित करण्यात आलेल्या आहेत. यानुसार इच्छुक उमेदवारांची थेट मुलाखती खालील पदनामानुसार नमुद केलेल्या दिवशी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, नवीन प्रशासकिय इमारत, वैद्यकिय आरोग्य विभाग, ६ वा मजला, भिवंडी येथे आवश्यक कागदपत्रकांच्या मुळ प्रती व साक्षांकित सत्य प्रतींसह विहीत नमुन्यातील भरलेल्या अर्जासह सकाळी ०९:३० ते दु. १२:०० वा. या वेळेत उपस्थित रहावे. अर्जाचा नमुना व सदर जाहिरात भिवंडी मनपा. www.bncmc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

➢ राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत ठोक मानधनावरील पदाचा तपशिल –

**१) वैद्यकिय अधिकारी (Full Time Medical Officer) - ८ – एम.बी.बी.एस.**

**(ठोक मासिक मानधन शासनामार्फत रु. ६०,०००/-)**

| अ.क्र | रिक्त पदे | अ.जा. १३ % | अ.ज. ७ % | विजाअ. ३ % | भजब २.५ % | भजक ३.५ % | भजड २ % | विमाप्र २ % | इमाव १९ % | एसईबीसी १३ % | इडब्ल्युएस १० % | अराखीव २५ % | एकूण १०० % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुर्ण वेळ वैद्यकिय अधिकारी | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ४ | ८ |

**२) वैद्यकिय अधिकारी (Part Time Medical Officer) - ९ - एम.बी.बी.एस.**

**(ठोक मासिक मानधन शासनामार्फत रु. ३०,०००/-)**

| अ.क्र | रिक्त पदे | अ.जा. १३ % | अ.ज. ७ % | विजाअ. ३ % | भजब २.५ % | भजक ३.५ % | भजड २ % | विमाप्र २ % | इमाव १९ % | एसईबीसी १३ % | इडब्ल्युएस १० % | अराखीव २५ % | एकूण १०० % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अर्ध वेळ वैद्यकिय अधिकारी | अराखीव – ९ | | | | | | | | | | | ९ |

**३) ए.एन.एम (ANM) - १९ –**

**(ठोक मासिक मानधन शासनामार्फत रु. १८,०००/-)**

| अ.क्र | रिक्त पदे | अ.जा. १३ % | अ.ज. ७ % | विजाअ. ३ % | भजब २.५ % | भजक ३.५ % | भजड २ % | एसबीसी २ % | इमाव १९ % | एसईबीसी १३ % | इडब्ल्युएस १० % | अराखीव २५ % | एकूण १०० % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्टाफ नर्स | १ | ० | ० | १ | १ | १ | १ | २ | ४ | ५ | ३ | १९ |

**४) औषधनिर्माता (Pharmacist) - ६ –**

**(ठोक मासिक मानधन शासनामार्फत रु. १७,०००/-)**

| अ.क्र | रिक्त पदे | अ.जा. १३ % | अ.ज. ७ % | विजाअ. ३ % | भजब २.५ % | भजक ३.५ % | भजड २ % | विमाप्र २ % | इमाव १९ % | एसईबीसी १३ % | इडब्ल्युएस १० % | अराखीव २५ % | एकूण १०० % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | फार्मासिस्ट | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | १ | ६ |
| २ | फार्मासिस्ट (क्षयरोग विभाग) | अराखीव –१ | | | | | | | | | | | १ |

➢ राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत ठोक मानधनावरील शैक्षणिक पात्रता/अर्हता –

| अ.क्र | पदनाम | आरक्षण | शैक्षणिक पात्रता | अनुभव | वयोमर्यादा | रिक्त पदे | ठोक मासिक मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुर्ण वेळ वैद्यकिय अधिकारी (Full Time Medical officer) | अ.जा.-१<br>अ.ज.-१<br>विजा-अ-१<br>इ.मा.व.-१<br>अराखिव-४ | एम.बी.बी.एस MBBS | Clinical Experience in Govt. and / or private sector & Registration with MMC | ४५ वर्षापर्यंत (निवृत्त शासकिय अधिकारी / विशेष तज्ज्ञ ७० वर्ष व कर्मचारी ६५ वर्षापर्यंत) NHM कर्मचारी ५ वर्ष शिथिल | ०८ | रु.६०,०००/- |
| २ | अर्ध वेळ वैद्यकिय अधिकारी (Part Time Medical Officer) | अराखिव-९ | एम.बी.बी.एस MBBS | Clinical Experience in Govt. and / or private sector & Registration with MMC | ४५ वर्षापर्यंत (निवृत्त शासकिय अधिकारी / विशेष तज्ज्ञ ७० वर्ष व कर्मचारी ६५ वर्षापर्यंत) NHM कर्मचारी ५ वर्ष शिथिल | ०९ | रु.३०,०००/- |
| ३ | ए.एन.एम. (ANM) | अ.जा.-१<br>भ.ज.(ब)-१<br>भ.ज.(क)-१<br>भ.ज.(ड)-१<br>एसईबीसी-४<br>एसबीसी-१<br>ईडब्ल्युएस-५<br>इमाव-२<br>अराखिव-३ | मान्यता प्राप्त संस्थेचा ए.एन.एम. अभ्यासक्रम उत्तीर्ण | महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. अनुभव असल्यास प्राधान्य | ३८ वर्षापर्यंत NHM कर्मचारी ५ वर्ष शिथिल | १९ | रु.१८,०००/- |
| ४ | फार्मासिस्ट (Pharmacist) | अ.ज.-१<br>विजा-अ-१<br>इमाव-१<br>एसईबीसी-१<br>ईडब्ल्युएस-१<br>अराखिव-१ | बी.फार्म (B.Pharm) / डी.फार्म (D.Pharm) | अनुभव असल्यास प्राधान्य, एम.एस.पी.सी. कडील नोंदणी अनिवार्य | ३८ वर्षापर्यंत NHM कर्मचारी ५ वर्ष शिथिल | ७ | रु.१७,०००/- |
| ५ | फार्मासिस्ट (Pharmacist) क्षयरोग विभाग | अराखिव-१ | बी.फार्म (B.Pharm) / डी.फार्म (D.Pharm) | अनुभव असल्यास प्राधान्य, एम.एस.पी.सी. कडील नोंदणी अनिवार्य | ३८ वर्षापर्यंत NHM कर्मचारी ५ वर्ष शिथिल | ७ | रु.१७,०००/- |

**मुलाखतीत येताना अर्जदाराने मुळ प्रमाणपत्रके सोबत आणावेत. तसे अर्जासोबत खालील प्रमाणे प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती आणाव्यात.**

१. **वयोमर्यादा :-**

१.१ अर्जदार / उमेदवाराचे वयासाठी थेट मुलाखतीच्या (Walk In Interview) रोजीचे वय ग्राह्य धरण्यात येईल.

२. **पद भरती गुणांकनाची विस्तृत कार्यपद्धती खालिलप्रमाणे राहिल –**

२.१ जाहिरातीत नमुद आवश्यक अधिकारी व कर्मचा-यांची थेट मुलाखत (Walk In Interview) पद्धतीने नियुक्ती करण्यात येईल.

२.२ राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत ठोक मानधनावर पुर्ण वेळ व अर्ध वेळ वैद्यकिय अधिकारी, स्टाफ नर्स व फार्मासिस्ट या पदांसाठी मा. आयुक्त सो., कुटुंब कल्याण व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचेकडील मार्गदर्शक सुचनेनुसार मुलाखत घेऊन गुणांकनाची पद्धत अवलंबली जाईल.

२.३ निवड झालेले उमेदवार व प्रतिक्षायादीमधील उमेदवार यांची यादी मुलाखत स्थळी तसेच महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर शक्यतो त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल.

२.४ निवड यादी गुणानुक्रमे प्रसिद्ध करण्यात येत असल्याने निवड झालेल्या उमेदवारांव्यतिरिक्त इतर सर्व उमेदवार प्रतिक्षा यादीत राहतील.

३. मुलाखतीचे स्थळ व वेळ :-

- राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत ठोक मानधनावरील पदभरती :-

| अ.क्र. | पद | दिनांक | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी, पुर्ण वेळ | दि. १२/०१/२०२१ | अर्ज स्विकारण्याची वेळ सकाळी ०९:३० ते दु. १२:०० वा. पर्यंत राहिल | भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, नवीन प्रशासकिय इमारत, ६ वा मजला, वैद्यकिय आरोग्य विभाग, भिवंडी, जि. ठाणे |
| २ | वैद्यकिय अधिकारी, अर्ध वेळ | | | |
| ३ | ए.एन.एम. | दि. १३/०१/२०२१ | | |
| ४ | फार्मासिस्ट | | | |

४. उमेदवार निवडण्याची पध्दत :-

४.१ मुलाखतीस येताना अर्जदाराने मुळ प्रमाणपत्र आणावीत. तसेच अर्जासोबत खालिल क्रमाने मुळ प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायाप्रती जोडाव्यात.

१) शैक्षणिक पात्रता (१० वी, १२ वी, पदनामासाठी विहीत अर्हता प्रमाणपत्र) अर्हतेची प्रमाणपत्र, तांत्रिक अर्हतेची प्रमाणपत्र

२) पदानुसार महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल प्रमाणपत्र

३) शाळा सोडल्याचा दाखला

४) आधार कार्ड

५) जातीचे प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र (Validity) (मागासवर्गीय असल्यास)

६) नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र

७) डोमिसाईल प्रमाणपत्र (महाराष्ट्रात वास्तव्य)

८) अनुभवाचे प्रमाणपत्र

९) उमेदवाराचे नजिकच्या काळातील २ रंगीत फोटो (रुंदी ३.५ सेमी व उंची ४.५ सेमी या आकाराचे)

१०) खुला प्रवर्ग उमेदवारांसाठी रु. ५००/- व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रु. ३००/- चा Demand Draft, Integrated Health & Family Welfare Society, BNCMC या नावाने जोडणे बंधनकारक आहे.

४.२ जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय, ठाणे व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर येथे नाव नोंदणी केली असल्यास त्याबाबतच्या नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत आणावी.

४.३ सर्व पदांकरिता मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

४.४ तोंडी मुलाखतीस येण्या-जाण्याचा कोणताही खर्च दिला जाणार नाही.

४.५ फक्त याच जाहिरातीला अनुसरुन प्राप्त झालेल्या उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. महानगरपालिकेकडे यापुर्वी केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच इतर राज्यातुन महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

४.६ उमेदवारांस एकापेक्षा अधिक पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास, पदनिहाय स्वतंत्र अर्ज वैयक्तिक माहितीसह (Bio-Data) व त्यासोबत शैक्षणिक पात्रता व इतर नमुद कागदपत्र विहीत नमुन्यात जोडून सादर करणे आवश्यक आहे. विहीत नमुन्यात नसलेले व अपुर्ण अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

४.७ उमेदवारांनी स्वत: निश्चित करावयाचे आहे की, ते आवेदीत पदांच्या सर्व अर्हता व अटी पुर्ण करतात. उमेदवार विहीत अर्हता व अटी पुर्ण करीत नसल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास सेवेतुन कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्र व्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

४.८ शासन निर्णय क्र. रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१०, दि. २७ जुन २०११ नुसार (I) परीक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागु राहणार नाही.

(II) सदर परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या परीक्षार्थीने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या परिक्षार्थीचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात देखिल अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

(III) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परिक्षार्थीसाठी लागू राहतील. इतर परिक्षार्थी/ उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

४.९ आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणा-या उमेदवारांना त्यासंदर्भातील सक्षम अधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र (Caste Certificate) व जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

४.१० एखाद्या अर्जदाराने त्याची निवड करणेसाठी निवड समितीवरील अध्यक्ष, सदस्य तसेच अधिका-यांवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष, राजकिय अथवा अन्य प्रकाराने दबाव आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास, त्यास निवड प्रक्रियेतुन अपात्र ठरविणेत येईल.

४.११ बिंदु नामावली नुसार राखिव प्रवर्गात अनुसरुन पद भरती जाहिरात दिल्यानंतर पुढील प्रक्रियेद्वारे अपेक्षित राखिव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास रीक्त पदांच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेवून व राष्ट्रीय आरोग्य अभियान कालमर्यादेत राबविणेचे अभियान आहे. ही बाब लक्षात घेवून ९ महिने कालावधीसाठी प्रतिक्षा यादीतील निवड केलेल्या खुल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांना तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल.

४.१२ राखिव जागेवर खुल्या प्रवर्गातुन उमेदवारांची केलेली नियुक्ती मागासवर्गीयांच्या राखीव जागेवर तात्पुरत्या स्वरुपात करण्यात आलेली असल्याने संबंधीत राखीव प्रवर्गातील उमेदवार प्राप्त झाल्यानंतर अशी नियुक्ती संपुष्टात येईल.

४.१३ राखिव जागेवर खुल्या प्रवर्गातुन उमेदवारांची तात्पुरती ९ महिन्यांसाठी नियुक्ती दिल्यानंतर त्या उमेदवारांच्या ९ महिन्यांचा नियुक्ती कालावधी संपुष्टात येण्यापुर्वी ३ महिने अगोदरपासून बिंदुनामावलीनुसार राखिव प्रवर्गास अनुसरुन पुनश्चः जाहिरात देवून राखिव जागेवरील उमेदवार उपलब्ध करुन घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

४.१४ मात्र दुस-या प्रयत्नात देखिल संपूर्ण पदभरतीची रीतसर प्रक्रिया राबवून राखिव जागेवर त्या-त्या प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध झाले नाहीतर वरील मुद्दा क्र.४.१३ नुसार राखिव जागेवर खुल्या प्रवर्गातुन नियुक्ती दिलेल्या उमेदवारांना पुढील ९ महिन्यांसाठी तात्पुरत्या फेरनियुक्ती देण्यात येईल. पुढील प्रत्येक ९ महिन्यांचे नियुक्तीसाठी उपरोक्त प्रक्रियेचा सातत्याने अवलंब करण्यात येईल.

४.१५ राष्ट्रीय आरोग्य अभियानातील पदे ही कंत्राटी स्वरुपाची असल्यामुळे मागासवर्गीय उमेदवारांच्या जात प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात येणार नाही. उमेदवारांनी फक्त जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र (Validity) यांची साक्षांकित छायाप्रत सादर करावी.

४.१६ पदवीधर अंशकालीन, माजी सैनिक या समांतर आरक्षण प्रवर्गातील अर्ज करणा-या उमेदवारांनी त्या-त्या समांतर आरक्षण प्रवर्गात मोडत असलेबाबतचे सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

४.१७ सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील पत्र क्रमांक पअंक-१०१०/७१७/प्र.क्र.३२२/१०/१६अ, दि.२६ ऑगस्ट २०१० पत्रान्वये एकदा नोकरी मिळाल्यानंतर पुन्हा दुस-या पदावर नोकरी मिळविण्यासाठी त्या समांतर आरक्षणाचा लाभ देणे हे शासन धोरणाशी विसंगत आहे. एकदा उमेदवाराने समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्या उमेदवारांस पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ देता येणार नाही.

४.१८ महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बाल कल्याण विभाग ८२/२००१ म.से.आ.२०००/प्र.क्र.४१५/का-२, दि.२५/०५/२००१ मधिल तरतुदीनुसार राहिल. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे मुदत संपुष्टात न आलेले वैध नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

४.१९ सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसुचना क्र.एस.आर.व्ही-२०००/प्र.क्र.१७/२०१०/१२, दि.२८/०३/२००५ व शासन परीपत्रक क्र.एस.आर.व्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दि.०१/०७/२००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान मुलांचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये दि.२८/०३/२००५ नुसार हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत लहान कुटुंब असल्याचे प्रतिज्ञापत्र सोबतच्या नमुन्यात अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणा-या अर्जदारांनीही विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्रात अविवाहीत असे लिहून अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

४.२० अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला (Domicile Certificate), तसेच जातीचा दाखला उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र अ.जा./अ.ज. उमेदवार/अर्जदार वगळून इतरांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसले बाबत (Non creamy-layer certificate) प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. साक्षांकित प्रती केंद्र/राज्य शासनाचे

४.२१ शासनाचे महिला व बाल विकास विभागाकडील निर्णय क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का.२, दि.२५/०५/२००१ अन्वये खुला, वि.जा.अ., भ.ज.ब, भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इ.मा.व. या प्रवर्गातील महिला उमेदवारांना राखिव पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास त्यांनी मुदत संपुष्टात न आलेले वैध नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

४.२२ वि.जा.अ., भ.ज.ब, भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इ.मा.व. या प्रवर्गातील उमेदवारांना सक्षम अधिकाराचे जात व मुदत संपुष्टात न आलेले वैध नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

४.२३ निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवारानी दिलेली माहिती/अगर कागदपत्र खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची निवड/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल. शासकिय सेवेत असल्यास बडतर्फ करण्यात येईल.

४.२४ एकाच स्थानासाठी दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास सामान्य प्रशासन विभाग यांसकडील शासन निर्णय क्र.प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दि.२७/०६/२००८ मधिल निर्णयामध्ये नमुद केल्यानुसार प्राधान्यक्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतीम निवड केली जाईल.

४.२५ अंतीम निवड यादीमधिल पात्र उमेदवारांनी अर्जासोबत सादर केलेल्या विविध प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती मुळ प्रमाणपत्रांच्या आधारे कागदपत्र तपासणीच्या वेळी तपासण्यात येतील. सदर प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती (Original copy) कागदपत्र तपासणीच्या वेळी उपलब्ध करुन देणे उमेदवारांवर बंधनकारक राहील. त्यामधिल प्रमाणपत्र खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

४.२६ निवड झालेल्या उमेदवारांची शैक्षणिक पात्रतेचा मुळ प्रमाणपत्र संबंधित मंडळ/विद्यापीठ/संस्था यांचे जवळ पाठवून सत्यता पडताळणी करण्यात येईल. त्यात खोटी आढळल्यास संबंधितांना नोकरीतुन कमी करुन फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

४.२७ निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्र/कागदपत्र सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

४.२८ निवड झालेल्या उमेदवारा विरुद्ध कोणताही गुन्हा नोंदविला नाही अथवा सिद्ध झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलिस स्टेशनकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. (१ माहच्या आत)

४.२९ जाहिरातीमधिल नमुद पदसंख्येत बदल होऊ शकतात व सदर भरती रद्द करणेचे अधिकार आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.

४.३० प्रशासकिय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांना आहेत.

५. <u>विशेष सुचना</u> :-

५.१ सेवायोजन कार्यालय, ठाणे/मुंबई, एकात्मिक आदीवासी विकास प्रकल्प अधिकारी, शहापूर, बोरीवली, मुंबई यांचेकडे नोंदणी केलेल्या उमंदवारोनी देखिल या जाहीरातीनुसार आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या मुळ/साक्षांकित प्रतींसह/वैयक्तिक माहितीसह अर्ज घेवून मुलाखतीस हजर रहावे.

५.२ मध्यस्थ/ठक/महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांच्या गैर मार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध रहावे. त्यातुन फसवणूक झाल्यास महानगरपालिका प्रशासन जबाबदार राहणार नाही.

स्वाक्षरी

आयुक्त

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी